INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# स्वयं सहाय्यता बचत गट ग्रामीण समाजातील महिलांच्या सक्षमीकरणाचे एक प्रभावी माध्यम

**प्रा. सौ. मेघा मोहन रतकंठीवार**
गृह–अर्थशास्त्र विभाग प्रमुख, यादवराव पोशट्टीवार कला महाविद्यालय, तळोधी (बाळापूर) – ४४१२२१
ता. नागभिड, जि. चंद्रपुर
megharatkanthiwar@gmail.com, Mob. No. 7385694013, 7083384427

**सार –**
ग्रामीण महिलांच्या विकासाचा अभ्यास करतांना महिलांच्या उन्नतीसाठी प्रामुख्याने सरकारद्वारा कार्यान्वीत करण्यात आलेल्या विवीध योजना विचारात घेणे आवश्यक आहे.महिलांच्या उन्नतीचे बचत गट एक साधनच नसून महिला सबलीकरण व सशक्तीकरणाची एक सुप्त क्रांतीकारी चळवळ आहे. ग्राम विकास विभागाद्वारे चालविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभीयान अंतर्गत महिलांच्या कौशल्य क्षमतेत वाढ करण्यात आली यामुळे अल्पावधीतच ग्रामीण महिला आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर झाल्या आणि ग्रामीण समाजातील महिलांच्या सक्षमीकरणास चालना मिळाली.

**प्रस्तावना –**

भारतीय समाज संरचनेत ग्रामीण समुदायाची बहूलता आहे,भारतामध्ये पाच लाखापेक्षा जास्त ग्रामीण समुदाय असून ७४.३ टक्के लोकसंख्या या समुदायात केंद्रीत झाली आहे. महात्मा गांधी, के. एम. पणीकर आणि समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण समूदायाच्या प्रचलनास अधोरेखित केले आहे. ग्रामीण समाज कृषीप्रधान असून गृहोद्योगाशी निगडीत आहेत. आधूनिक काळात ग्रामीण जीवनाचे स्वयंपूर्ण स्थितीतील सजातीयता ही वैशिष्टये बदलेली आहेत. गावा–गावात आणि गाव–शहरात आंतरक्रिया वाढली असून औद्योगीकरण, शहरीकरण दळणवळणाच्या साधनात झालेल्या वाढीमुळे ग्रामीण समाजात परिवर्तनाचे वारे प्रत्ययास येत आहे.

ग्रामीण महिला विकासाचे तात्पर्य मुख्यत: ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या गरीब व मागासवर्गीस महिलाचे जीवनमान उंचावणे होय. ग्रामीण महिलांच्या विकास प्रक्रियेमध्ये आर्थीक आणि सामाजिक दोन्ही दृष्टिकोनाचा व्यापक असा समावेश होतो. भारताच्या संदर्भात भौगोलिक आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीच्या कारणाने ग्रामिण क्षेत्रातील महिलांचा विकास ही एक जटील सामाजिक समस्या आहे. ग्रामिण क्षेत्रात राहणाऱ्या गरीब महिलांचे जीवनमान सुधारण्यासाठी पुष्कळ कार्यक्रम आयोजित केले जातात. स्वतंत्र भारतामध्ये ग्रामीण क्षेत्राचा जो अविकसित मापदंड आहे त्याच्यामध्ये स्त्रि–पूरूष विषमता दुर करून महिला सक्षमीकरण करणे महत्वपुर्ण आहे.

“स्त्रीने स्वत:च्या क्षमतांची ओळख करून त्या क्षमतांचा विकास करण्यासाठी घरगुती व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रीयेत सहभागी होऊन आत्मनिर्भरतेने व आत्मविश्वासाने काम करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. ”

बचत गट म्हणजे ठराविक काळाने बचत जमा करण्याच्या निमीत्ताने एकत्र येणारा गट.

“बचत गट हा एक सामाजिक–आर्थिक उपक्रम आहे, ही प्रक्रीया स्वत: संघटितपणे एकमेकांना समजुन घेत होत असल्यामुळे या रचनेला स्वयं–सहायता गट असेही संबोधीले जाते. ” गटाला काहीतरी विशिष्ट नाव ठेवले जाते. उदा. आदर्श बचत गट, स्वयंसिद्धा बचत गट इ.

बांग्लादेशात नोबल पूरस्कार विजेते व बचत गटांच्या चळवळीचे जनक डॉ.महंमद युनूस यांनी राबविलेल्या बचत गटाच्या प्रयोगाला अभूतपुर्व यश मीळाले. महिलामध्ये बचत गटाच्या माध्यमातुन कमालीचा आत्मविश्वास निर्माण झाला. यातून प्रेरणा घेऊन पुरूषाच्या बरोबरीने असणाऱ्या महिलांना सक्षम करण्यासाठी स्वयंसहाय्यता महिला बचत गट योजना भारताने स्विकारली.भारतामध्ये स्वयं सहाय्यता बचत गटाची चळवळ “म्हैसुर रिसेटलमेंट अँड डेव्हलपमेंट एजन्सी (मायराडा)”या संस्थेने सुरू केली .या योजनेचा मुख्य उद्देश सामुहिक सबलीकरणातून महिला सक्षमीकरण व महिला उद्योगातून सामुहिक दारिद्रय निर्मूलन असा आहे. ‘Women need development –Development need women’ या ध्येयाने “महिलांचा बचतीत पुढाकार त्याला शासनाचा आधार” या तत्वानुसार ही योजना सुरू आहे. ग्रामीण भागात बॅंक व सहकारी सोसायटयांचे मोठे जाळे निर्माण झाले तरी गरीबांना छोटया मोठया गरजांसाठी सावकारावर अवलंबून रहावे लागत असे. भरमसाठ व्याजदरामुळे एकदा माणुस सावकाराच्या पाषात अडकला की, त्याची सुटका नाही. संसाराचा गाडा चालविण्यासाठी मुख्य जबाबदारी पेलणाऱ्या महिलांना तर बॅंकांची दारे बंद होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या पार्श्वभूमीवर

राश्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बॅकेनं (नाबार्ड) बचतीची सवय लावणारा सहजगत्या बॅक कर्ज उपलब्ध करून देणारा स्वयं सहाय्यता गट बॅक संलग्नता कार्यक्रम नावाचा पथदर्शी कार्यक्रम १९९१–९२ साली सुरू केला.त्यावेळी फक्त ५००गटांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. गेल्या दोन दशकामध्ये हा कार्यक्रम जगातील सर्वात मोठा सुक्ष्म पतपुरवठा कार्यक्रम समजला जातो. महाराष्ट्रातीत या कार्यक्रमाने चांगली प्रगती केली आहे.

स्वयं सहाय्यता गट बॅक जोडणी कार्यक्रमाचे नाबार्डने अगदी सुरूवातीपासुन वेळोवेळी विविध दृष्टीकोनातून मूल्यांकन केले. स्वयं–सहाय्यता गटासारखी अनौपचारिक संस्था इतक्या दिर्घ काळानंतरही अतिशय कृतीशीलपणे कार्यरत आहे ही बाब महत्वाची आहे. या गटामधील महिलांची एकजूट, एकजीनसीपणा त्यांच्यातील आपलेपणा हया गोष्टी या बाबतीत कारणीभुत आहेत. म्हणूनच बचत गट ही शाश्वत संस्था आहे हे यातून दिसून येते.

“वर्तन, कौशल्य, अभिव्यक्ती,जमाखर्चाचा ताळेबंद जोपर्यंत महिला करू शकणार नाही तोवर महिलांची उन्नती व सक्षमीकरण अशक्य आहे.”असे मत स्त्री अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. याच धर्तीवर महिला स्वयं सहाय्यता बचत गट या अभियानाची वाटचाल सुरू झाली आणि हे अभियान महीलांच्या विकासाला चालना देणारे ठरले.बचत गटात सहभागी झाल्यानंतर महिला आता धाडासाने सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रतीनीधीत्व करू लागल्या आहेत. केवळ शेतीच नाही तर दुग्धउत्पादन व कुक्कुटपालन यासारखे व्यवसायात देखील यशस्वी होत आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभीयान अंतर्गत महीलांना प्रशीक्षण देऊन गावात आरोग्य,स्वच्छता, पारंपारिक पद्धतीतील सुधारीत बदल, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता,कुटूंब नीयोजन, अनावश्यक खर्च याबाबत सामाजीक जागृती करून बचत गटामार्फत ग्रामीण महिलांना पतपुरवठा केला जातो. वर्षभरात जवळपास २५ कोटींचा पतपुरवठा ग्रामीण महिला घेतात त्यातून काही महीला उद्योगधंद्याकडे वळून स्वयंरोजगार करू लागल्या आहे. या अभीयानाच्या माध्यमातून कृषी सखीद्वारे महीलांना कमी खर्चात जास्त उत्पादन घेण्याचे मार्गदर्शन केले जाते.पशु सखीद्वारे दुग्ध उत्पादनावर भर दिला जातो. याशीवाय दीनदयाल कौशल्य योजनेद्वारे ग्रामीण महिलांच्या कुटूंबातील युवक युवतींना प्रशीक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहे. ऑगस्ट २०१८ लोकमत न्यूज नेटवर्क मध्ये प्रकाशीत बातमीनूसार राज्यात एकूण १.८१ लाख बचत गट कार्यरत असून या बचत गटांकरीता वर्षभराचा निधी २०० कोटी रूपयांच्यावर प्राप्त होत आहे.

चंद्रपुर जिल्हयात आतापर्यंत १२,५०० स्वयं सहाय्यता बचतगट असून, ४१० ग्रामसंघाची स्थापना करण्यात आली आहे.या अभियानाशी जिल्हयातील जवळपास १लाख ३३ हजार ७१८ कुटूंब जुळले असून या महीलांच्या माध्यमातून कुटूंबाची आर्थिक उन्नती साधली जात असुन हे अभियान महिलांच्या विकासाला नवा दिशा देणारे ठरले आहे.

**ग्रामिण समाजातिल महिलांच्या विकासात स्वयं–सहायत्ता बचत गटाची (Self Help Group) भुमिका–** महिला बचत गटांची स्थापना हा महिलांच्या सक्षमीकरणाच्या वाटचालीतील एक महत्वाचा टप्पा आहे त्यामुळे केवळ बचत करणे व कर्ज वाटणे एवढयापुरतीच बचत गटांच्या कार्याची व्याप्ती नाही त्यामुळे बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे विवीध सामाजिक प्रश्न, विषय याबाबत चर्चा करणे व त्यासाठी बचत गटामार्फत सामुहिकपणे काही कृती करणे याचाही विचार केला जातो. ग्रामिण समाजातिल महिलांच्या विकासात स्वयं–सहायत्ता बचत गटांची भुमिका खालील बाबींवरून स्पष्ट होते.

- ग्रामीण समाजातिल महिलाच्या विकासात स्वयं –सहायता गटाच्या माध्यमातुन पडलेला प्रभाव या मध्ये आर्थिक, सामाजीक, शैक्षणिक, मनोरंजन, राहणीमान, नवीन तंत्रज्ञान, स्वयं–सहायता गटामार्फत निवडलेले उद्योग, उद्योगाचा विकास आणि येणा–या अडचणी, महिलांच्या आर्थिक, सामाजिक सांस्कृतीक सक्षमीकरण, बचत प्रवृतीतील बदल कौटुबीक व राहणीमानातील बदल, स्वंय सहायता गटातील सदस्यांना शासकिय योजनेबाबत जागृती या सर्व घटकांवर स्वयं–सहायता गटाच्या माध्यमातुन प्रभाव पडलेला दिसून येतो.
- ग्रामीण भागातील लोकांचा स्वयं–सहायता गटाबाबत असा विचार आहे की, जो काही विकास घडुन येत आहे ते स्वयं–सहायता बचत गटाच्या माध्यमातुनच होत आहे. कारण शासनाची स्वयं–सहायता गटांना केरोसीन परवाना, स्वस्त धान्य दुकान परवाना, अंगणवाडी शिधा वाटप परवाना, इत्यादी परवाने व योजना हया बचत गटांना दिल्या जात आहे. म्हणुन स्वयं –सहायता गटांचा विकास जोमाने होवून त्याचा ग्रामीण समाजातिल महिलांच्या जीवनामध्ये फार मोठा परिवर्तनात्मक विकास होतांना दिसत आहे.
- महिला स्वयं–सहायता बचत गटाच्या माध्यमातुन आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडत आहे. त्याच बरोबर महिला स्वयं–सहायता गटाच्या माध्यमातुन शासकीय ग्रामीण योजनेबद्दल माहिती घेत असुन स्वयं–सहायता गटाची भुमिका फार महत्वाची असल्याचे दिसुन येते.

- महिलांना विमा उतरविण्याचे महत्व व उद्‌देश हे गटाच्या माध्यमातुन कळले बहुतांश महिला विमा उतरवितांना दिसुन येते आहे, त्यांना शासनाच्या विविध विभागातील कर्मचारी, स्वयं सेवी संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, इत्यादी मार्फत मार्गदर्शन तर मिळतेच, तसेच शासनाचे प्रेरक / प्रेरिका म्हणुन कर्मचारी, स्वयं –सहायता गट सुदृढ करण्यासाठी, सदस्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी मार्गदर्शन करतात.
- बचत गटाच्या माध्यमातून.बचतीच्या सवयी बरोबरच स्वयंरोजगार करण्याची प्रेरणा महिलांना मिळाली आहे, उद्योग निवडण्याचे योग्य मार्गदर्शन मिळाल्याने त्यांनी स्वत:चा उद्योग अथवा व्यवसाय निवडलेला आहे, चुल आणि मूल इतकेच विश्व असणाऱ्या महिला आज बचत गटाच्या माध्यमातुन बाहय जगाच्या संपर्कात आल्या आहे.
- आज महिलांनी अनेक उद्योग व्यवसाय बचत गटाच्या माधमातून उभारले आहेत व त्यांनी तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी म्हणून शासलही प्रयत्नशाील आहे. "महालक्ष्मी सरस" ही सारखे प्रदर्शन भरवून महिला बचत गटाच्या विवीध उत्पादनाला बाजारपेठ मीळत आहे.
- महिलांमध्ये असणारे संवाद कौशल्य, वेळेचे नियोजन,अर्थकारणाची सांगड, जबाबदारीची जाणीव,जोखीम स्वीकारण्याची वृत्ती,परिस्थीती हाताळण्याची कला,त्यामध्ये यशस्वी होण्याची क्षमता, नेतृत्व गुण, चोख व्यवहार इत्यादी उपजत गुणांचा विकास होऊन त्याआधारे बचत गटातील महिला उद्योग क्षेत्रात आपले कतृत्व सिद्ध करीत आहे. यामुळे बचत गटाचे मुख्य उद्दिष्ट केवळ पैशाची बचत करणे नसून महिलांच्या हाताला काम मिळवून देणे आणि स्वमिळकतीत अत्मसन्मान मिळवुन देणे साध्य होत आहे.
- गटातील सदस्य गट चालविण्यासाठी १०० ते २०० रूपये पर्यत बॅकेत जमा करतात. त्याच आधारावर किवा क्रेंडीटवर बॅक त्यांना कर्ज देते व त्या घेतलेल्या कर्जावर आपला व्यवसाय करतात. परंतु काही स्वयं–सहायता गटांना बचत करण्यासाठी अडचणी निर्माण होते त्यामध्ये सर्वात जास्त सदस्यांना घरगुती अडचणी असल्यामुळे बचत करतांना त्रास होतो , परंतु जेव्हापासुन गटाची निर्मीती झाली आहे तेव्हापासुन महिला नियमित बचत करत असुन बॅकेचे व्यवहार कळु लागले आहे. गटात येण्यापुर्वी बॅकेचे व्यवहार नकरणाऱ्या महिला आता बॅकेचे व्यवहार करीत आहेत. तसेच बहुतांश महिला बॅके व्यतीरिक्त इतर वित्तीय संस्थेशी व्यवहार करीत नव्हत्या परंतु गटाच्या माध्यमातुन पोस्ट ऑफिस आर. डी. ,जीवन विमा, आणि इतर वित्तीय संस्थाशी व्यवहार करीत असल्याचे दिसुन येते.
- मिळालेल्या नफ्यातुन गटातील महिलांना आपल्या कुटुंबाच्या आर्थीक अडचणी सोडविण्यास मदत होते आणि तसेच स्वयं – सहायता गटाच्या माध्यमातुन सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून त्यामध्ये महिला सहभागी होत आहे.
- गटामार्फत स्त्री जागृती कार्यक्रम देखील घेतले जातात त्या कार्यक्रमाव्दारे स्त्रीयांना आपले अधिकार, कर्तव्य व इतर मार्गदर्शनपर माहिती देण्यात येते, अशा प्रकारचे कार्यक्रम स्त्री जागृतीचे कार्य करतात.
- बहुतांश स्त्रीयांना कायदेविषयक हक्काची माहिती नव्हती परंतु सद्य स्थितीत स्वयं–सहायता गटाच्या माध्यमातुन स्त्रियांना कायदेविषयक हक्काची जाणीव निर्माण होत आहे. तसेच बहुतांश स्त्रीयांना महिला व बालकल्याण विषयक माहिती नव्हती परंतु स्वयं–सहायता गटाच्या माध्यमातुन ती माहिती त्यांना मिळु लागली आहे. त्याच बरोबर आपले हक्क, कर्तव्य, उत्तरदायित्व इत्यादी बद्‌दल त्यांच्यात जागृती निर्माण होत आहे.
- स्वयं–सहायता गटाच्या निर्मितीमुळे आज महिलांना कुटुंबामध्ये आर्थीक स्थिती उंचावता आली असुन कुटुंबामध्ये वैचारीक दर्जा उंचावला आहे. त्यामुळे त्यांना सन्मान प्राप्त होतांना दिसुन येतो. गटात सहभागी होण्यापुर्वी कुटुंबांचे वार्षीक उत्पत्र फार कमी होते परंतु गटाच्या माध्यमातून कुटुंबाचे वार्षीक उत्पत्र वाढत आहे आणि गटाच्या सदस्यांच्या घरातील चैनीच्या व उपभोग्य वस्तुत वाढ झाल्याचे दिसुन येते म्हणुन एकंदरीत त्याच्या जीवनमानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसुन येते.
- स्वयं सहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रातील विविध उद्योग, लघु उद्योग कुटीर उद्योग व विकासमय योजना यांच्या माध्यमातुन महिलांचा विकास झाल्याचे दिसून आले.
- कुटूबातील इतरांकडून अत्याचार किंवा छळ व कौटूबिक निर्णय प्रक्रियेत महत्व या दोन बाबीचा अभ्यास करण्यात आला आहे. दारू पिऊन नवऱ्याने मारहाण करणे किंवा हुंडयासाठी छळ करणे अशा घटना

वृत्तपत्रात येत असल्यामळे अशा प्रकारांविरूध्द गटांचा नैतिक व सक्रीय पाठिंबा मिळतो व असे प्रकार कमी होतात हे अभ्यासावरून सिध्द झाले .गटांमुळे कुटुंबात स्त्रीला मानाचे स्थान मिळाले.

- माहिती तंत्रज्ञान व डिजीटल युगातील अनेक साधनांचा बचत गटाच्या चळवळीला हातभार लागला आहं. नाबार्डने ई शक्ती हा कार्यक्रम विकसीत केला असून यशस्वीनी अभियानाच्या माध्यमातून आता माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातही महिला बचत गटाची वाटचाल सुरू झाली आहे. .

स्त्रिया एकत्रीत येऊन व्यवसाय करत असल्यामुळे आणि ही पारदर्शक सहकाराची प्रक्रिया असल्यामुळे स्त्रियांमध्ये मोठया प्रमाणात उद्योजकता निर्माण झाली आहे. अनेक प्रकारचे उद्योग या चळवळीतून जन्माला आले असून ग्रामीण समाजातील महिलांच्या सक्षमीकरणास चालना मिळाली आहे याची काही प्रभावी उदाहरणे खाली दिली आहेत.

- सामूहिक दुग्ध व्यवसाय – कोल्हापूर जिल्हाच्या दुर्गम आशा शाहूवाडी तालुक्यातील सरस्वती महिला बचत गटाने दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून स्वत:च्या आर्थीक आणि सामाजीक सक्षमीकरणा बरोबरच केवळ ४०० लोकसंख्या असलेल्या या गावाचा कायापालट घडवुन आणला आहे.
- सॅनिटरी नॅपकिन उद्योग – सोलापूर जिल्हापूर अक्कलकोट जवळच्या जेऊर येथील ‘श्री जीवनज्योती महिला विकास बचत गट’हा सॅनिटरी नॅपकिन बनवणारा महाराष्ट्रातील पहिला बचत गट असून आज महाराष्ट्रात २५ जिल्हयात सॅनिटरी नॅपकिन नीर्मीतीचे युनीट्स स्थापन झाले आहेत. शिवाय कर्नाटकात अफजलपुरम् येथे, सिक्कीमतधील गंगटोक येथे,बग्गी (हिमाचल प्रदेश), कर्ननिपूरम् (बिहार),बिलासपूर (छत्तीसगड) अशा अनेक ठिकाणी ही युनीट्स आकार घेत आहे.
- बचत गटाद्वारे आजकाल शासकीय कार्यालयात सायकल,स्कूटर स्टॅड चालविणे,अंगणवाडी आहार पूरविणे, लोणचे कुरवडया पापड फराळाचे पदार्थ, आयुर्वेदीक औषधी, तयार वस्त्र व साडया, अगरबत्ती, बांबूच्या शोभीवंत वस्तू तयार करून विक्रीस ठेवणे इ दृ सेवा पूरविल्या जातात यामूळे गटातील महिलांच्या वैयक्तीक उद्योगालाही प्रोत्साहन मिळत आहे.

वरील सर्व गोष्टीचा आढावा घेतला असता महिलांवर मोठ्या प्रमाणावर स्वयं–सहायता गटाचा प्रभाव पडलेला दिसुन येतो. या सर्व अभ्यासावरून असे लक्षात येते की, स्वयं–सहाय्यता गटात सहभागी झाल्यामुळे महिलांच्या आर्थिक परिस्थितीत चांगला बदल झाला आहे. त्यांची बचत वाढली, सावकारावर अवलंबून राहणे संपले गटातून सहजगत्या वेळोवेळी कर्ज घेऊन दैनंदिन गरजा भागल्या व उत्पन्न वाढविण्यास उपयोग झाला.साधनसंपत्ती वाढवणे शक्य झाले, अन्न व आरोग्य सुरक्षितता मिळाली. त्याचप्रमाणे सामाजिक परिवर्तन होऊन महिलांना समाजात व कुटुबात मानाचे स्थान मिळाले, त्यांचे संक्षमीकरण झाले. एकंदरीतच स्वयं–सहाय्यता गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महीलांचा विकास होत आहे. संपुर्ण ग्रामिण समाजातील महिलांचे जीवनमान उंचावेल त्यासाठी त्यांना प्रोत्साहन आणि संधी देण्याची आवश्यकता आहे. म्हणुन स्वयं–सहायता गटाच्या माध्यमातुन ग्रामिण समाजातील महिलांचा जो विकास झाला आहे तो ग्रामिण समाज जीवनाचा एक घटक म्हणुन या क्षेत्रातील महिला स्वयं–सहायता गटाच्या सदस्याच्या बरोबर इतर ग्रामीण सदस्याचे देखील कल्याण होईल असे आपणास ठामपणे सांगता येईल. तसेच महिलांच्या सबलीकरणाचे मुळ आर्थिकतेत असल्यामुळे आर्थिक सुबत्तेबाबत महिलावर्गातील उपेक्षीतता दूर करून , महिलांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवून, महिलांचे समाजातील स्थान पक्के करण्यासाठी स्वयं–सहायता बचत गटाची भूमीका महत्वपूर्ण आहे. एकूणच ग्रामिण समाजातिल महिलांच्या विकासात स्वयं–सहायत्ता बचत गटांची (Self Help Group) भुमिका स्पष्ट करतांना डॉ. शिवांगी झरकर यांच्या ओळी आठवतात,

“स्वप्न माझे इवलेसे, दोन्ही बाहू सामावते,
देऊन उभारी आत्मीयतेला,
दहाही दिशांत कीर्ती गाजवते,
मिळून साथ एकमेकांची,झेप माझी उभारतं,
उद्योग सेतू बांधतांना, बचत गटाची मैत्री माझी वाढवते.”

**संदर्भ ग्रंथसूची**


1. ‘पंखांना एकीचे बळ’. दैनिक लोकसत्ता, ८ मार्च २०१४.
2. ‘उद्योगीनी : निर्मल यशोगाथा’. दैनिक लोकसत्ता, २४ ऑगस्ट २०१५.
3. ‘आता माहिती तंत्रज्ञानातही महिली बचत गट’. दैनिक लोकसत्ता, ७ सप्टेंबर २०१३.
4. बरहाटे एन.एल, शिक्षण संक्रमण,मार्च २०१५, पृष्ठ क्र. ६.
5. मुलानी एम.यू, महिला स्वयं सहायता बचतगट , डायमंड पब्लिकेशन, पुणे.
6. मुलानी एम.यू, अल्पबचत नियोजन (बचतगट), डायमंड पब्लिकेशन, पुणे.
7. http://www.maharashtrastat.com/socialandwelfareschemes/27/ruralschemes/247/selfhelpgroups/18063/stats.aspx

8. http://www.theinternationaljournal.org/ojs/index.php?journal=tij&page=article&op=view&path%5B%5D=2079
9. http://www.umed.in/DocumentFiles/Sampark_Final_Report_Study%20on%20SHGs-Federations-Livelihood-collectives_August14_2014.pdf
10. http://www.unionbankofindia.co.in/RABD_Other_SelfHelpGroups.aspx
11. http://www.yourarticlelibrary.com/india-2/self-help-group/self-help-group-shg-of-india-meaning-need-and-objectives/66718/
12. https://en.wikipedia.org/wiki/Self-help_group_(finance)
13. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AC%E0%A4%9A%E0%A4%A4_%E0%A4%97%E0%A4%9
14. https://wp.me/p4g3S9-1vH
15. Mahila Bachat Gat,www.bookganga.com
16. आपटे ज.श., भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे तरूण भारत पुरवणी, आंतरराष्टीत ग्रामीण महिला दिन विशेष, १५ ऑक्टोंबर.

❖❖❖❖